# प्रेसनोट

दि.०१/११/२०२१

## मौजे साते ता.वडगाव मावळ जिल्हा पुणे येथील सरपंच व ग्रामपंचायत सदस्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | वडगाव मावळ पोलीस स्टेशन गु.र.नं. २१२/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ५३ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - संतोष पोपट शिंदे, सरपंच, साते ग्रामपंचायत, ता. वडगाव मावळ, जि.पुणे (अद्याप अटक नाही)<br>२) लोकसेवक - ऋषीनाथ मारुती आगळमे, ग्रामपंचायत सदस्य, साते, ता.वडगाव मावळ जि.पुणे (अटक) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,२५,०००/- (एक लाख पंचवीस हजार रुपये) |
| लाच स्वीकारली रक्कम | १,००,०००/- (एक लाख रुपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी :- दिनांक - २८/१०/२०२१<br>सापळा दिनांक :- दिनांक ३१/१०/२०२१<br>यातील तक्रारदार यांचे पत्नीचे नावे भंगार खरेदी विक्रीचे दुकान असून त्या दुकानाबाबत स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयात तक्रारी अर्ज केला होता. सदरचे दुकान चालु ठेवणेकरीता ग्रामपंचायतीची एन.ओ.सी. देण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र. १ व २ यांनी तक्रारदार यांचकडे रु.१,२५,०००/- ची लाचेची मागणी केली होती. त्याअनुषंगाने दि. २८/१०/२०२१ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आरोपी क्र.१ व २ यानी मिळून तक्रारदार यांचे दुकान चालू ठेवणेकरीता प्रथम रु.१,२५,०००/-लाचेच्या रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु.१,००,०००/- रक्कमेची मागणी केली दि.३१/१०/२०२१ रोजी १२:१० वा.चे सुमारास यातील आरोपी क्र.२ ऋषिनाथ आगळमे यानी हॉटेल शिवराजचे पाठीमागे कान्हे फाटा येथे तक्रारदार यांचेकडुन रु.१,००,०००/- लाच रक्कम स्वीकारल्यावर त्यास रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले असून त्या दोघांवर वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्यात आला.<br>मा. विशेष न्यायालयाने अटक आरोपी क्रमांक २ याची दिनांक ०३/११/२०२१ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. तपास श्री.भारत साळुंखे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे युनिट हे करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.